(आजचा विचार )

योगा योग

1) जन्म 2 जानेवारी
2) दोघेही (नवरा बायको ) पोस्ट ग्रॅज्युएट -- सतीश फिजिक्स व अनिता एकॉनॉमिक्स घेऊन.
3) दोघे ही आय ए एस
4) दोघांना गव्हमेंट सर्व्हिस ओरिसांत
5) मुले दोन -- एक मुलगा एक मुलगी
6) सतीशला बहीणी दोनच
7) अनिताला भाऊ दोनच
8) घरांत दोन फ्रीज
9) घरांत दोन टी व्ही
12) मोठया बहीणीला दोनच मुलगे
13) छोटया बहीणीला दोनच मुले मुलगी मुलगा

असं खूपच साम्य. दोघांच लव्ह मॅरेज. मुलगा लग्न ठरवून आला. सून बंगाली, आम्ही महाराष्ट्रीयन, कसे पटणार असे वाटले. मोठया मुलीला बंगाली येत होते. जावई तर कलकत्याला रहात होते म्हणून बंगाली छानच येत असे. आणि दोनाचा चमत्कार बघून मला हंसू येते. सांगायची गोष्ट म्हणजे मला पण दोनच नाती 1 मुलीची मुलगी (प्राची) व दुसरी मुलाची मुलगी (सृष्टि). म्हणायला मात्र आम्ही अद्वैती पण प्रत्यक्षांत द्वैतीच. भारताचे दोन दिवस 15 ऑगस्ट व 26 जानेवारी दोन्ही राष्ट्रीय सण (पुन्हा दोनच ) भाषा इंग्लिश व हिंदी (दोन). राष्ट्रगीताचा वाद -- वंदे मातरम की जनमन गण असा भारताबाबतही दोनाचा प्रभाव.